[illegible] नुतनीकरण पा.क्र.22

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.


**अग्निशमन व आणीबाणी सेवा**

गणेशनगर रोड, जुने मार्केटजवळ, नांदेड.

दुरध्वनी क्र. 101, 02462- 255555,
फॅक्स क्र. 02462-232071

www.nwcmc.gov.in email : info@nwcmc.gov.in, fire@nwcmc.gov.in


जा.क्र. नांवाशमनपा/अवअसे/ 130 /24, दिनांक 11 / 07 /2024

**प्रति,**
**नागपुर फ्रान्सलीन कार्पोरेशन नागपुर,**
**संचलीत, ज्ञानमाता विद्या विहार, नांदेड.**

विषय:- ' अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्रा ' बाबत.

संदर्भ:-1. जा.क्र. नांवशमनपा/अवअसे/ 905/17, दिनांक 27.10.2017 अन्वये तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र

2. जा.क्र. नांवशमनपा/अवअसे/1702/19, दिनांक 15.03.2019 अन्वये नाहरकत प्रमाणपत्र
3. जा.क्र. नांवशमनपा/अवअसे/832/22, दिनांक 19.10.2022 अन्वये नाहरकत प्रमाणपत्र
4. संबधीताचा अर्ज दि. 16/02/2019.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने या विभागाच्या अधिका-याने **नागपुर फ्रान्सलीन कार्पोरेशन नागपुर, संचलीत, ज्ञानमाता विद्या विहार, नांदेड** या शैक्षणीक प्रयोजनासाठी निर्देशित केलेल्या इमारतीत शासन मान्य (इमारतीचे मालक/विकासक/भोगवटदार) (इमारतीचे मालक/विकास/भोगवटदार) यांनी दाखल केलेल्या मॅक्सेफ फयर सर्व्हिस, औरंगाबाद या शासनमान्य अनुज्ञाप्ती धारकाने अग्निशमन यंत्रणा दुरुस्त व कार्यक्षम असल्या बाबतचे प्रमाणपत्र 'ब' सोबत जोडलेल्या यादी नुसार दिनांक 11/07/2024 रोजी आग प्रतिबंधकात्मक साहित्याची तपासणी केली ती समाधानकारक आहे.

सदरचे 'अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र ' हे जारी केलल्या दिनांकापासुन एका वर्षापर्यंत वैद्य राहिल या नंतर अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील. तसेच तपासणी दरम्यान आढळुन आलेली आग प्रतिबंधात्मक व जीव संरक्षक उपायोजना ही भविष्यात तशीच राहील याची दक्षता घ्यावी.

**महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपायोजना अधिनियम 2006 नुसार खालील <u>दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.</u>**

1. महाराट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियमातील नियम क्र. 3 नुसार अर्जदाराने (विकासक, मालक, भोगवटदार किंवा ज्या अभिनामाने बोध करण्यात येईल तो) आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना 2006 व भारतीय राट्रीय इमारत संहीता 2016 आणी त्या मध्ये वेळो- वेळी केलेल्या सुधारनेनुसार अमलबजावणी करणे बंधककारक राहील. या कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता संबधीताने घ्यावी.

2. सदर अधिनियमातीलन कलम क्र. 3 मधील पोट कलम 3 नुसार अर्जदाराने आग प्रतिबंधक जीवसंरक्षक उपाययोजनांची तरतुद केली आहे या बाबतचे लायसन्स प्राप्त अभिकरणा कडुन दिलेले विहीत नमुण्यातील प्रमाणपत्र व पोट कलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुरुस्त आणी कार्यक्षम स्थितीत ठेवल्याबाबतचे विहीत नमुण्यातील **प्रमाणपत्र " ब "** मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे कडे वर्षातुन दोन वेळा (जानेवारी व जुलै या महिण्यामध्ये) सादर करावा.
3. कोणतीही व्यक्ती आपल्या इमारतीत किंवा तिच्या भागात बसविलेले आग प्रतिबंधक उपकरण बिघडविणार नाही, त्यामध्ये फेरबदल करणार नाही, ते काढुन टाकणार नाही किंवा त्याला कोणतेही हाणी व नुकसान पोहचविणार नाही किंवा कोणत्याही व्यक्तीला तसे करणे बाबत चिथावणी देणार नाही.

---2---

4. सदर इमारतीत अग्निशमन प्रतिबंधात्मक उपाययोजना सुस्थितीत असल्यानंतर ,तसेच या पुर्वी यंत्रणात काही त्रुटी आढळल्या बाबत आपणास नोटीस मिळाली नसेल किंवा त्या ठिकाणी आगी पासुन कुठलीही घटना घडली नसेल तरच हे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.
5. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 नुसार लावण्यात येणारी अग्निशमन सेवा फी/मनपा फीस नजर चुकीणे कमी लावण्यात आल्यास, होणारी फरकाची रक्कम ही नाहरकत प्रमाणपत्र घेते वेळेस भरावी लागेल.
6. तात्पुरत्या नाहरकत प्रमाणपत्रामध्ये दिलेल्या सर्व अटीच्या पुर्ततेस ग्राहय धरून तसेच इतर कुठलेही बदल होणार नाही आणी सदर इमारतीत काही बदल करावयाचे असल्यास खालील स्वाक्षरीतास कळवुन बदल / वाढ करण्यात यावी.
7. संवैधानिक तरतुदीमध्ये वारंवार होणा-या बदलास अधिन राहुन अतिरिक्त सुचना करण्याचा अधिकार सदर स्वाक्षरीकर्त्याने राखुन ठेवण्यात आला आहे.

या अटी व शर्तीच्या अधिन राहुन सदरचे अग्निशमन "नाहरकत प्रमाणपत्र" देण्यात येत आहे.

अग्निशमन अधिकारी
अग्निशमन व आणीबाणी सेवा
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.**

1. मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.